दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • शुक्रवार दि.१३ मार्च २०२६ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक १९५ • पाने ४ • किंमत ४ रुपये
Beed (Mahmar) Daily Marathi • Friday 13 March 2026 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 195 • Pages 4 • Rate 4 Rs

## राज्यात घरगुती एलपीजीचा तुटवडा नाही

**मुंबई**–इराण – इस्राईल युद्धाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या घरगुती व व्यावसायिक वापराच्या गॅस सिलेंडर सुरळीत पुरवठयाबाबत राज्य शासन विविध उपाययोजना राबवत आहे. घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण होऊ नयेत आणि संभाव्य टंचाईच्या परिस्थितीत समन्वय साधता यावा, यासाठी राज्य शासनाने जिल्हास्तरावर विशेष समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे.संपूर्ण राज्यामध्ये एलपीजी सुरळीत ठेवण्याविषयी तसेच पुरवठ्यावर नियंत्रण ठेवण्याच्या अनुषंगाने आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणांना अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर यांनी दिले आहेत.घरगुती गॅस सिलिंडरचा पुरवठा सुरळीत होत राहील, याची नागरिकांनी निश्चिंतता बाळगावी, अशी ग्वाही अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण विभागामार्फत देण्यात आली आहे. मार्च महिन्यामध्ये गेल्या सहा महिन्याच्या तुलनेत अधिक प्रमाणात घरगुती गॅस सिलेंडर उपलब्ध असून युद्धाच्या पार्श्वभूमीवर घरगुती गॅस सिलिंडर पुरवठा सुरळीत राहील याची खबरदारी घेण्याच्या सूचना विभागामार्फत सर्व संबंधित यंत्रणांना देण्यात आल्या आहेत.

# गॅस टंचाईमुळे राज्यात चूल विझण्याची वेळ

## सरकारने दिशाभूल न करता वस्तुस्थिती स्पष्ट करावी–काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांची विधानसभेत मागणी

**राज्यात घरगुती गॅसचा तीव्र तुटवडा निर्माण झाल्याने सर्वसामान्य नागरिक, विशेषत: गृहिणींमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. एकीकडे सरकार विकासाच्या गप्पा मारत असताना दुसरीकडे जनतेसमोर चूल पेटविण्याचा प्रश्न उभा ठाकला आहे. त्यामुळे सरकारने जनतेची दिशाभूल न करता गॅस पुरवठ्याबाबतची खरी परिस्थिती स्पष्ट करावी, अशी जोरदार मागणी काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी आज विधानसभेत केली. राज्यातील गॅस टंचाईचा मुद्दा उपस्थित करताना वडेट्टीवार म्हणाले की, काल विधानसभेचे कामकाज रात्री एक वाजेपर्यंत सुरू होते. मात्र, गॅसच्या अभावामुळे विधानसभा कँटीनही बंद ठेवावी लागली. बाहेरील अनेक हॉटेल्सही गॅसअभावी बंद असल्याची स्थिती आहे. मुंबई आणि नागपूरसारख्या मोठ्या शहरांमध्ये जवळपास ३० टक्के हॉटेल्स गॅस तुटवड्यामुळे बंद ठेवावी लागत असल्याची माहिती त्यांनी सभागृहात दिली. या परिस्थितीचा थेट परिणाम अर्थव्यवस्थेवर होत असून व्यापारी आणि कामगार वर्ग अडचणीत सापडत असल्याचे त्यांनी नमूद केले.**



**मुंबई । प्रतिनिधी**

गॅस टंचाईमुळे काळाबाजार वाढण्याची शक्यताही त्यांनी व्यक्त केली. याच पार्श्वभूमीवर काल एचपीसीच्या सुमारे १८ लाख रुपयांच्या गॅस सिलिंडरने भरलेल्या ट्रकची चोरी झाल्याची घटना घडल्याचे सांगत त्यांनी कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीनेही ही बाब गंभीर असल्याचे अधोरेखित केले. दरम्यान, गॅस टंचाईच्या निषेधार्थ कोल्हापूर, विदर्भासह राज्यातील विविध भागांत आंदोलने सुरू झाली असून महिलांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे, असेही वडेट्टीवार म्हणाले. अधिवेशन सुरू असताना या गंभीर प्रश्नावर सरकारने स्पष्ट भूमिका मांडावी, अशी मागणी करताना त्यांनी सांगितले की, गॅस पुरवठा हा केंद्र सरकारच्या अखत्यारीत येत असला तरी राज्य सरकारने सद्यस्थितीबाबत माहिती सभागृहात द्यावी. जागतिक परिस्थिती किंवा युद्धजन्य कारणांमुळे पुरवठा विस्कळीत झाला असेल, तर राज्यातील सध्याचा गॅस साठा किती आहे आणि पुरवठा सुरळीत करण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या जात आहेत, याबाबत सरकारने स्पष्ट निवेदन करावे, अशी मागणी त्यांनी केली. यावर विधानसभेच्या अध्यक्षांनी निर्देश देताना सांगितले की, हा विषय केंद्राशी संबंधित असला तरी राज्य सरकार जनतेच्या हितासाठी आवश्यक ती सर्व पावले उचलेल.

# केज शहराच्या मुख्य महामार्गावर वाहनांची कोंडी; बाह्य बाजू वळण रस्त्याची गरज

### लोकप्रतिनिधींचा पुढाकार हवा

खा.रजनीताई पाटील, खा.बजरंग सोनवणे, आमदार नमिता मुंदडा, नगराध्यक्षा डॉ.सौ. सीताताई बनसोड, रमेशराव आडसकर यांनी पुढाकार घेऊन नेहमी वाहतुकीची कोंडी होत असलेला प्रश्न सोडवावा अशी मागणी केली जात आहे.

### व्यवसायिकांची मागणी

केज शहरातील शाळा महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थी यांना या गर्दीमुळे मोठा त्रास सहन करावा लागत आहे.केज तालुक्याची मुख्य बाजारपेठ आहे. ग्रामीण भागातून शेतकरी कामगार नोकरदार व्यावसायिक यांची शहरात नेहमीच गर्दी असते.पंचायत समिती, तहसील कार्यालय, शासकीय रुग्णालय, पोलीस स्टेशन,न्यायालय अशी प्रशासकीय कार्यालये असल्याने त्या कामाने निमित्त येणाऱ्या वाहनधारकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. त्यांनाही त्रास सहन करावा लागतो. व्यवसायिकांना तासनतास ताटकळत व्यवसाय बंद ठेवावे लागतात.मुख्य महामार्गा वरची वाहतूक बाह्य वळण मार्गाने वळवावी अशी मागणी केली जात आहे.



दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज शहराच्या मध्यवर्ती भागातून खामगाव - पंढरपूर व अहमदपूर अहिल्यानगर हे महामार्ग जातात.इतरत्र बाजारपेठ नसल्यामुळे शासकीय रुग्णालय,भवानी चौक, छत्रपती शिवाजीमहाराज चौक ते शिक्षक कॉलनी या भागात मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजूला सतत गर्दी झालेली असते.वाहनांची कोंडी होते.गर्दीमुळे यापूर्वी अनेक वेळा शहरात अपघात झाले आहेत. यामुळे यापूर्वी अनेकांना जीव गमावा लागला आहे.महामार्गावरून जाणाऱ्या वाहनांसाठी बाह्य बाजू रस्त्याची आवश्यकता आहे.बाह्य वळण रस्ता तयार झाल्यास वाहनांची कोंडी होणार नाही.रहदारीचा प्रश्न सुटेल.अपघातात जाणारे जीव वाचतील. तात्काळ बायपास तयार करावा अशी मागणी केली जात आहे.यादोन्ही मुख्य महामार्गावरून जाणाऱ्या वाहनांच्या संख्येत वाढत आहे.हे दोन्ही मार्ग शहरात नेहमीच गर्दीने वाहनांची कोंडी झालेले असतात.

पादचाऱ्यांना वाहनाने धडकून अनेक वेळा अपघात झाले आहेत. यामुळे वाहतुकीसाठी अधिकचा वेळही लागतो आणि जीवित हानी होत आहे.बाह्य वळण रस्ता तयार झाल्यास कमी वेळेत अधिकचा प्रवास करणे प्रवाशांना शक्य होईल.नेहमी रस्ते जाम होण्याची समस्या सुटणे शक्य होईल .

# महसूल समाधान शिबिरातून ७९ गावांना दिलासा

**रविंद्र वळवी । मोलगी**

अक्कलकुवा तालुक्यातील सातपुडा परिसरातील नागरिकांना विविध दाखल्यांसाठी महसूल कार्यालयाच्या फे-यांपासून मुक्ती देण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर महत्त्वपूर्ण ठरणार आहे. मोलगी येथे अप्पर तहसीलदार कार्यालय सुरळीत सुरु झाल्यानंतर अपर तहसीलदार नितीन पाटील यांनी महसूल सेवा जनतेच्या दारी हे धोरण प्रभावीपणे राबवण्यास सुरुवात केली आहे. त्या अनुषंगाने विविध ठिकाणी शिबीरे आयोजित करण्यात येत आहेत. यापूर्वी सातपुड्यातील दुर्गम व आदिवासी भागातील नागरिकांना सातबारा, उत्पन्न दाखला, रहिवासी प्रमाणपत्र यांसारख्या मूलभूत महसुली कागदपत्रांसाठी तालुक्याच्या ठिकाणी जावे लागत होते. प्रवासखर्च, वेळ आणि कामधंद्याचे नुकसान यामुळे जनतेवर मोठा आर्थिक व मानसिक ताण येत होता. मात्र मोलगी येथील अप्पर तहसीलदार पद कायस्वरुपी भरल्याने हा प्रश्न आता मार्गी लागत आहे. या पार्श्वभूमीवर सातपुडयाच्या अतिदुर्गम भागातील तीन महसूल मंडळांतील एकूण ७९ गावांसाठी टप्प्याटप्प्याने

विशेष शिबिरे आयोजित करण्यात आली आहेत. दि. १४ मार्च रोजी भगदरी, तसेच दि.१७ एप्रिल रोजी सरी, दि १० एप्रिल रोजी वडफळी येथे संबंधित ग्रामपंचायतीच्या मुख्य ठिकाणी ही शिबिरे पार पडणार आहेत. या शिबिरांमध्ये नवीन फेरफार नोंदणी, सातबारा उता-यातील चुका दुरुस्ती,आठ 'अ' उतारा वाटप, उत्पन्न, रहिवासी व जातीचे प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेअर व नॉन ॲग्रीकल्चर परवानगी, सिकलसेल पीडितांसाठी योजना, तुकडेबंदी अधिनियमाशी संबंधित प्रकरणे, विद्यार्थ्यांचे विविध दाखले, मोजणी अर्ज, पीएम किसान योजना, पुरवठा विभागाची प्रकरणे तसेच ग्रामविकासाशी संबंधित सेवा उपलब्ध करुन दिल्या जाणार आहेत. महसूल सेवा अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचाव्यात यासाठी संबंधित तलाठी, ग्रामसेवक व इतर शासकीय कर्मचाऱ्यांना शिबिर स्थळी उपस्थित राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. अल्पावधीतच कर्तव्यदक्ष व जनाभिमुख अधिकारी म्हणून नावलौकिक मिळवणाऱ्या श्री.पाटील यांच्या या उपक्रमामुळे सातपुड्यातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. शिबिरां व्यतिरिक्त नियमित महसुली व अर्धन्यायिक कामकाज मोलगी येथे विश्रामगृहाच्या पाठीमागील भागात सुरु असलेल्या अप्पर तहसीलदार कार्यालयात नियमितपणे सुरु राहणार असल्याची माहितीही प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

# युसुफ वडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा चि.समर्थ श्रीपाद बोरगावकर याची इन्स्पायर अवॉर्डसाठी निवड

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

भारतीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयामार्फत (केंद्र सरकार) इन्स्पायर अवार्ड मानक चा रिझल्ट २०२५-२६ जाहीर झाला असून,या स्कीम अंतर्गत नवसंशोधनासाठी शालेय विद्यार्थ्यांची नवोपक्रम व विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात नवीन संशोधन व चिकित्सा करण्याच्या हेतूने हजारो नव बाल संशोधक तथा बाल वैज्ञानिकांची निवड करण्यात येते.त्यातून महाराष्ट्र राज्यातून २३०३ बाल वैज्ञानिकांची इन्स्पायर अवॉर्डसाठी निवड केली आहे.त्यात बीड जिल्ह्यातील २२ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.त्यातून केज तालुक्यातून युसुफ वडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा चि.समर्थ श्रीपाद बोरगावकर इयत्ता सातवी याची इन्स्पायर अवॉर्ड बाल वैज्ञानिक म्हणून निवड झाली आहे.त्याच्या यशाबद्दल संस्था सचिव





श्री.दीपक दादा घुमरे, संस्था अध्यक्ष श्री.यु.बी. सुकाळे,विद्यालयाचे प्राचार्यश्री.भोसले ए.यु, पर्यवेक्षक श्री.शेख एम. बी,उच्च माध्यमिक विभागप्रमुख श्री.चव्हाण एन.एन संस्थेचे श्री.घुमरे प्रदीप सर त्याला मार्गदर्शन करणारे श्री. खराडे सर,गडकर सर, भांडे सर,धायगुडे सर, मुकदम सर,तरकसबंद सर,शिक्षक,प्राध्यापक, पालक असंख्य नागरिकांनी हार्दिक अभिनंदन केले आहे.व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# व्यापारी महासंघाच्या वतीने केज पोलीस स्टेशनला दिलेल्या वॉटर फिल्टरचे लोकार्पण

## पोलीस निरीक्षकांनी व्यक्त केली कृतज्ञता

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

आपल्या समाजोपयोगी उपक्रमांनी सतत क्रियाशील असलेल्या येथील व्यापारी महासंघाच्या वतीने केज पोलीस स्टेशनला वॉटर फिल्टर विथ कुलिंग सिस्टम भेट देण्यात आले होते त्याच्यालोकार्पणाचा छोटेखानी कार्यक्रम काल दि.१२ मार्च वार गुरुवार रोजी मोठ्या उत्साहात पार पडला केज पोलीस स्टेशनला वेगवेगळ्या कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांची पिण्याच्या पाण्यासाठी होणारी अडचण लक्षात घेत व्यापारी महासंघाचे अध्यक्ष महादेव सूर्यवंशी यांनी व्यापारी संघाच्या वतीने केज पोलीस स्टेशनला वॉटर फिल्टर विथ कुलिंग सिस्टम देण्याची ईच्छा केज पोलीस स्टेशनचे इंचार्ज असलेले पोलीस निरीक्षक




स्वप्नील उनवणे यांच्याकडे व्यक्त केली असता उनवणे यांनी सकारात्मकता दर्शवली होती.त्यानुसार केज पोलीस स्टेशनच्या आवारात फिल्टर व कुलिंग मशीन बसवण्यात आले व फीत कापुन व श्रीफळ फोडून त्याचे लोकार्पण देखील लागलीच करण्यात आले

व्यापारी महासंघाच्या वतीने पोलीस स्टेशन मध्ये बसवण्यात आलेल्या वॉटर फिल्टर मुळे सर्वसामान्यांची पिण्याच्या पाण्याची सोय होण्यास मदत होणार असल्यामुळे पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांनी व्यापारी बांधवांचे आभार व्यक्त करत कृतज्ञता व्यक्त केली.

तर केजमधील व्यापारी बांधव नेहमीचसामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रामाणिक प्रयत्न नेहमीच करत आला असुन गरजेनुसार असेच उपक्रम भविष्यात राबविण्यासाठी आम्ही कटिबद्ध राहु अशी ग्वाही यावेळी महासंघाचे अध्यक्ष महादेव सूर्यवंशी यांनी दिली. यावेळी प्रा. हनुमंत भोसले,विकास अप्पा मिरगणे,पांडुरंग मिटकरी,सुहास चिद्रवार, निरंजन लोकरे,भूषण भन्साळी,गोविंद कणसे, सुरेश थोरात,गोविंद जाजू,नितीन काळे, प्रकाश जाडकर,रणजित निंगुळे,आदित्य मिटकरी, मयूर मांडलीया यांच्या सह अनेक व्यापारी बांधव व पोलीस कर्मचारी यांची यावेळी उपस्थिती होती.

# संपादकीय

## उंबरठ्यावरील युद्धझळा



इराण-अमेरिका आणि इस्रायल यांच्यातील युद्ध पश्चिम आशियात सुरू असले, तरी त्यातून निर्माण झालेली आनुषंगिक संकटे गॅसटंचाईमुळे आपल्या स्वयंपाकघरात येऊन ठेपली आहेत. शेअर बाजारात दररोज होत असलेले भूकंप, बंदरांमधील जहाजांमध्ये कुलूपबंद झालेली आयात-निर्यात, तेलाच्या दरांमधील चढउतार आणि स्वयंपाक व औद्योगिक गॅसच्या तुटवड्याने ठिकठिकाणी दिसून येणाऱ्या रांगा- दरवाढ यांचे चटके आता सर्वसामान्यांना बसू लागले आहेत.एकीकडे तेलाचा ओघ आटू लागल्याने आयातीवर आलेला ताण आणि निर्यात रखडल्याने शेतीमाल-फळांसारख्या नाशवंत मालाचे संभाव्य नुकसान होण्याची भीती आहे. विशेषत: द्रवरूप नैसर्गिक वायूचा पुरवठा विस्कळित झाल्याने महाराष्ट्रापासून गुजरातपर्यंत अनेक उद्योगांचे उत्पादनचक्र थंडावत असल्याचे चित्र दिसते आहे. अशा एकाच वेळी मंदी व महागाईच्या दुहेरी कात्रीत सापडण्याची भीती साधार ठरू लागली आहे. रशियन तेलाचा पुरवठा सुरू राहणार असल्याने सध्या तरी भारत सुपात असला, तरी युद्ध लांबल्यास होणाऱ्या जागतिक परिणामांमुळे आपणही जात्यात येण्यास वेळ लागणार नाही, अशी परिस्थिती दिसते. करोना साथीनंतर सावरलेल्या जगाला युद्धज्वरामुळे पुन्हा फटके बसण्याची भीती उभी राहिली आहे.गेल्या काही काळात जगभरात विकासदर मंदावला असला, तरी भारतीय अर्थव्यवस्थेने या काळातही ब्रिटन आणि जपानसारख्या देशांना मागे टाकून मोठी भरारी घेतली होती. मात्र, या वेगाला इराण-अमेरिका आणि इस्रायल युद्धाची नजर लागली, असे म्हणावे लागेल. विशेषत: इराणने होर्मुझच्या सामुद्रधुनीतून तेलवाहू जहाजांची वाहतूक रोखल्याने तेलसंकट उभे राहिले आहे. याचा साहजिक परिणाम म्हणून कतारसारख्या देशाने गॅसचे उत्पादन थांबवले. भारतातील अनेक उद्योगांतील उत्पादनचक्र त्यामुळे थंडावते आहे. छत्रपती संभाजीनगरसारख्या भागातील अभियांत्रिकी कारखान्यांतील उत्पादनांपासून ते गुजरातमधील 'सिरॅमिक' उत्पादन थंडावले असून, हजारो कामगार बेरोजगार होण्याची भीती आहे. तज्ज्ञांच्या मते युद्ध सुरू झाल्यापासून जगभरातील तब्बल १८ कोटी बॅरल इंधनाचा पुरवठा बाधित झाला आहे. त्यामुळे कच्च्या तेलाच्या दरांनी शंभरी ओलांडली होती; अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी 'युद्ध समाप्तीच्या दिशेने' असल्याचे विधान केल्याने तेलाच्या दरवाढीला काहीसा ब्रेक लागला असला, तरी कोणीही स्थैर्याची हमी देऊ शकत नाही. इंधनावर अवलंबून असलेला वाहन उद्योग, रंग उद्योग, टायर, प्लास्टिकसारख्या अनेक क्षेत्रांना फटके बसत आहेत.आखातातून होणारा खतांचाही पुरवठा थांबला आहे आणि केळी, द्राक्षे, कांद्यापासून कलिंगडापर्यंत शेतीमालाची निर्यात रखडल्याने बळीराजा दुहेरी चिंतेत आहे. या अस्थिर परिस्थितीचे फटके पर्यटनालाही बसत आहेत. तेजी-मंदीच्या लाटांवर स्वार होणाऱ्या जगातील शेअर बाजारांमध्ये या अस्थिरतेचे प्रतिबिंब न दिसते तरच नवल! मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक अडीच हजार अंकांनी घसरून नंतर सावरला, तर 'निफ्टी'तही सव्वाचारशे अंकांनी घट झाली.नागरिकांमधील चिंता आणि परिस्थितीचा फायदा घेणाऱ्या साठेबाजांना चाप लावण्यासाठी केंद्र सरकारने अत्यावश्यक वस्तू नियंत्रण कायदा (इस्मा) लागू केला असला, तरी अनेक शहरांमध्ये सिलिंडरसाठी लागलेल्या रांगा, या सर्वसामान्यांमधील घबराटीचेच निदर्शक म्हणाव्या लागतील. अशा स्थितीत उपाययोजनांची व्याप्ती वाढणे आवश्यक आहे; त्याप्रमाणेच ऊर्जेबाबत स्वयंपूर्णतेचे लक्ष्य मैलोगणती दूर असले, तरी त्या दिशेने वाटचालीसाठी ठोस कार्यक्रम हाती घेण्याची आणि धोरणात्मक स्वायत्तता राखून ऊर्जापुरवठ्यातील विविधीकरणाची जाणीव या निमित्ताने अधोरेखित होते.युद्धाच्या पार्श्वभूमीवर परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी 'भारत शांतता आणि संवादाच्या बाजूने आहे,' अशी देशाची भूमिका स्पष्ट केली; तसेच तणाव कमी करण्यावर भर देऊन या देशांतील भारतीय समुदायाच्या सुरक्षिततेबाबतही चिंता व्यक्त केली. मात्र, त्यातून युद्धविषयक सडेतोड भूमिकेची अपेक्षा पूर्ण न झाल्याने आणि संसदेत चर्चेची संधी न मिळाल्याने विरोधक आक्षेप घेणे साहजिक आहेत. इंधन तुटवडा आणि दरवाढीने जग होरपळत असून गरीब-विकसनशील देशांचे अर्थकारण मोडून पडत आहे. मात्र, 'शांतता आणि सुरक्षिततेसाठी ही किंमत किरकोळ आहे,' ही ट्रम्प महाशयांची दिव्यवाणी त्यांना जगाची किती चाड आहे, हेच दर्शवणारी आहे, एवढे मात्र खरे.

# संसदेत एलपीजी टंचाईच्या प्रश्नावर विरोधकांचे जोरदार निदर्शन

## जनतेच्या अडचणींकडे केंद्र सरकारचे दुर्लक्ष-खा.बजरंग सोनवणे

**दैनिक वादळ वार्ता**
**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

देशभरात घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या वाढत्या टंचाईमुळे सामान्य नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून या प्रश्नावर संसदेतही जोरदार पडसाद उमटले. वाढती महागाई आणि गॅस सिलिंडरची टंचाई यामुळे सर्वसामान्यांचे घरगुती अर्थकारण कोलमडत असल्याचा आरोप करत विरोधी पक्षातील खासदारांनी संसद परिसरात जोरदार निदर्शने केली.विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली विरोधकांनी केंद्र सरकारविरोधात घोषणाबाजी करत सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. यावेळी बीडचे खासदार बजरंग मनोहर सोनवणे यांनीही आक्रमक भूमिका घेत जनतेच्या अडचणी संसदेत मांडल्या.
सध्या देशातील अनेक भागांमध्ये घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरचा तुटवडा जाणवत असल्याने गृहिणींचे घरगुती बजेट बिघडले आहे. गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबांपुढे स्वयंपाकाचा प्रश्न निर्माण झाला असून नागरिकांना गॅस सिलिंडरसाठी प्रतीक्षा करावी लागत असल्याची तक्रार आहे. आधीच महागाईच्या झळा सहन करणाऱ्या जनतेवर गॅस टंचाईचे संकट कोसळल्याने सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.याबाबत बोलताना खासदार बजरंग सोनवणे म्हणाले की, 'देशभरातील जनतेला गॅस टंचाईचा मोठा फटका बसत असताना केंद्र सरकार मात्र या गंभीर समस्येकडे दुर्लक्ष करत आहे. नागरिकांच्या अडचणी लक्षात घेऊन तातडीने गॅस पुरवठा सुरळीत करण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात.'दरम्यान, जनतेच्या प्रश्नांवर सरकारला जागे करण्यासाठी विरोधकांचा लढा अधिक तीव्र करण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला. महागाई, एलपीजी टंचाई आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर संसदेत आवाज उठवत जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी संघर्ष सुरूच राहील, असेही सोनवणे यांनी स्पष्ट केले.संसदेच्या चालू केंद्रीय अधिवेशनात या मुद्द्यावरून राजकीय वातावरण तापण्याची चिन्हे असून, पुढील काही दिवसांत हा प्रश्न अधिक गाजण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे



# आहार व तणाव रहित जीवन यावरच मानवी आरोग्य अवलंबून आहे-युवासंत चंद्रकांत (दादासाहेब ) मोरे

## परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे अभिष्टचिंतन निमित्त महा आरोग्य तसेच रक्तदान शिबीर संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**
**माजलगाव । प्रतिनिधी**

गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स माजलगाव च्या तर्फे आयोजित परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या अभिष्टचिंतन निमित्त महा आरोग्य शिबिराच्या उदघाटन प्रसंगी युवासंत चंद्रकांत (दादासाहेब) मोरे बोलत होते यावेळी त्यांनी सांगितले की, आपले आरोग्य आपल्या आहारावर अवलंबून आहे, मानवी आरोग्यासाठी षड्रस आवश्यक असते. सकस, सेंद्रिय अन्न यामुळे आरोग्य सुदृढ राहते. याबरोबरच आयुर्वेद, आजीबाईचा बटवा, घरगुती दैनंदिन वापरातील औषधी वस्तू याविषयी अनमोल माहिती दिली. मानवी आरोग्याचे दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे ताणतणाव आहे. आरोग्यदायी जीवनासाठी तणाव रहित राहिले पाहिजे. या शिबीराची सुरुवात दीपप्रज्वलन, श्री स्वामी समर्थ महाराज, धन्वंतरी, छत्रपती शिवाजी महाराज तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पूजन करून झाले.

यावेळी भव्य रक्तदान शिबीरही घेण्यात आले होते. या रक्तदान शिबिरामध्ये २१३ रक्तदात्यांनी रक्तदान केले. या महा आरोग्य शिबीरात सर्व रोगांची



मोफत तपासणी व उपचार करण्यात आले.
या शिबीराचे प्रास्ताविक करताना डॉ. यशवंत राजेभोसले यांनी या महा आरोग्य शिबीराचे वैशिष्ट्य व पार्श्वभूमी मांडली. गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट च्या निर्मितीपासून आजपर्यंत ची यशस्वी वाटचाल ही भगवान दत्तस्वरूप श्री स्वामी समर्थ महाराज व परमपूज्य गुरुमाऊलींच्या आशिर्वादाने चालू आहे. इवलेसे रोप लावियेले द्वारी! त्याचा वेलु गेला गगनावरी! फार्मसी कॉलेज सुरू केले आज बी ए एम एस, नर्सिंग, फिजिओथेरपी इत्यादी शिक्षणाची दारे खुली झाली याचे सर्व श्रेय परमपूज्य गुरुमाऊलींचे आहे म्हणूनच परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज अड कॅन्सर रिसर्च सेंटर हे नाव युनिटला दिले. यानंतर कॅन्सर तज्ञ डॉ. नंदकुमार पाणसे यांनी आपल्या मनोगतातून सदगुरू प पू मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल त्र्यंबकेश्वर चे सामाजिक उपक्रम व गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट ने आयोजित केलेले महा आरोग्य शिबीर हा स्तुत्य उपक्रम आहे व या शिबीरास शुभेच्छा दिल्या. या शिबीरात सणवार व्रत वैकल्याची मांडणी करण्यात आली होती तसेच विवाह संस्कार स्टॉल लावण्यात आले होते. यावेळी श्री स्वामी समर्थ सेवा मार्गाचे मराठवाडा विभाग प्रतिनिधी संदीपभाऊ देशमुख, बीड जिल्हा प्रतिनिधी प्रा. डॉ. गोविंद साळुंके, अहिल्यानगर जिल्हा प्रतिनिधी विजयराव कडु पाटील, युवा नेते रोहितभैय्या पंडित, बीड, परळी वै , अंबाजोगाई, धारुर, वडवणी, गेवराई, माजलगाव तालुक्यातील तसेच परभणी, नांदेड, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सर्व साप्ताहिक, दैनिक केंद्रातील सेवेकरी भाविक, आरोग्यसेवा देण्यासाठी सदगुरू प पू मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल चे डॉ शेवाळे, डॉ. जयेश पाटील, डॉ राघवेंद्र राजेश्वरकर, डॉ महेश काळे, डॉ संभाजी लोंढे डॉ सौ विजया दुलांगे इत्यादी उपस्थित होते. तसेच माजलगाव शहरातील डॉ सुशील लोढा, डॉ प्रवीण वारकरी, डॉ संदीप नाटकर, डॉ अशोक घुबडे, डॉ गोळेकर, डॉ शशील पाचपोर, पत्रकार बांधव, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट तसेच श्री स्वामी समर्थ सेवेकरी परिवाराने परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार आरोग्य दुत बीड जिल्हा प्रतिनिधी शिवशंकर भंडारे यांनी केले.

# रास्त धान्य दुकानदारांचे भीक मागो आंदोलन,पनवेल पुरवठा अधिकारी यांच्या मनमानी कारभाराला कंटाळून सर्व दुकानदार राजीनामे देणार

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

पनवेल तहसील पुरवठा विभागाकडून अनियमित व मासिक नियतनापेक्षा कमी पुरवठा करण्यात येत आहे. त्यात देण्यात येणाऱ्या धान्यापेक्षा ई-पॉज मशीनवर जादा टाकण्यात येते. आणि प्रत्येक गोणी मागे ३ ते ४ किलो धान्य कमी येते. याच प्रमाणे ई-पॉज मशीनवर जादा टाकण्यात आलेल्या धान्याचा या कार्यालया मार्फत अपहार केला जातो. त्यामुळे लाभार्थींना धान्य वाटप करता येत नाही. आणि दुकानदारांना मोठे नुकसान सहन करावे लागत आहे. परिणामी दुकानदारात तीव्र नाराजी असून त्यांनी अघोषित संप जाहीर केला आहे. या बाबतचा निर्णय दुकानदारांच्या खांदा कॉलनी येथील शिवसेना कार्यालय झालेल्या बैठकीत घेण्यात आला.पनवेल तालुक्यातील प्राधान्य व अंत्योदय योजनेत राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेतील लाभार्थी रेशनकार्ड धारकांना, शासनाकडून वितरणासाठी उपलब्द झालेले धान्य, तसेच दुकानदारांनी ऑनलाईन वाटप केलेले धान्य व



प्रत्यक्ष दुकानदारांना वाटपासाठी दिलेले धान्य, सन जानेवारी २०२५ पासून रदद केलेले रेशनकार्ड तसेच उत्पन्न कमी करून योजनेचा लाभ दिलेले नवीन रेशनकार्ड, व त्यांना वाटप केलेले धान्य तसेच रेशनकार्ड वरील कमी केलेली लोकसंख्येची माहिती यात मोठी तफावत असून याची नुकसान भरपाई दुकानदारांच्या माथी मारली जात आहे. गेली अनेक वर्षापासून रास्त धान्य दुकानदारांना लाभार्थी प्रमाणे धान्य वाटप केले जात नाही. ई-पॉज मशीनवर जादा धान्य टाकून दुकानदारांची फसवणूक केली जाते. दुकानदारांनी वजन करून घेण्याची जबरदस्ती केली तरी ते ठेकेदारांकडून कधीही धान्य वजन करून दिले जात नाही. प्रत्येक गोणी मागे ३ ते ४ किलो धान्य कमी दिले जाते. ई-पॉज मशीनवर जादा टाकलेले धान्य आणि गोणी मधून कमी दिलेले धान्य याचा अपहरण पनवेल पुरवठा अधिकारी, गोदाम व्यवस्थापक आणि ठेकेदार यांच्या संगनमताने केला जातो. यात मोठा भ्रष्टाचार होत आहे. आणि याचा सर्व भुर्दंड दुकानदारांना भरावा लागतो. त्यामुळे संपूर्ण दुकानदार खचून गेले आहेत. त्यानी भीक मागून आंदोलन करुन त्यातून जमा होणारे पैसे पुरवठा अधिकारी यांना देण्याचा निर्णय आहे. त्याच बरोबर सर्वांनी एकत्र दुकानाचे राजीनामे देण्याचा महत्वाचा निर्णय या बैठीत घेतला आहे.

# जासईच्या उपसरपंचपदी काँग्रेसच्या सुलोचना घरत यांची बिनविरोध निवड

## उपसरपंच निवडीने काँग्रेस कार्यकर्त्यांचा सन्मान-महेंद्रशेठ घरत

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील जासईच्या उपसरपंचपदी महाविकास आघाडीच्या सुलोचना पद्माकर घरत (काँग्रेस) यांची मंगळवारी (ता. १०) बिनविरोध निवड करण्यात आली. सरपंच संतोष घरत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सुलोचना घरत यांचा एकच अर्ज आल्याने बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. यावेळी जासई ग्रुप ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य उपस्थित होते. उपसरपंचपदी निवड झाल्यानंतर आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत म्हणाले, नवनिर्वाचित उपसरपंच सुलोचना घरत आणि त्यांचे पती दिवंगत पद्माकर घरत हे धडाडीचे कार्यकर्ते, परंतु दुर्दैवाने पद्माकर घरत या कार्यकर्त्याचे अकाली निधन झाले. सुलोचनाताईंनी पती आजारी असताना उत्तम साथ दिली, याची मला जाणीव आहे. त्यामुळे जेव्हा उपसरपंच पदाचे निवडणूक जाहीर होताच मी सुलोचनाताईंना उपसरपंचपदी बसवा, अशी विनंती केली. महाविकास आघाडीच्या सर्व सदस्यांनी, नेत्यांनी मनावर घेतले. त्यामुळे सुलोचना ताई उपसरपंचपदी विराजमान झाल्या. यामुळे मला माझ्या काँग्रेस कार्यकर्त्याचा सार्थ अभिमान आहे. शेकाप आणि महाविकास आघाडीच्या सर्वच कार्यकर्त्यांच्या, पदाधिकारी यांच्या मेहनतीने आणि उत्तम सहकार्याने उरणमध्ये आज आपली ताकद दाखवून दिली आहे. लढाऊ महिला निवडून आल्या. काँग्रेसमध्ये सर्वांना सन्मान आहे. आपण सर्व कार्यकर्ते आहोत. मी आपल्यासोबत खंबीरपणे उभा आहे. यावेळी पतीच्या आठवणीने उपसरपंच सुलोचना घरत भाऊक झाल्या होत्या. महेंद्रशेठ घरत यांनी त्यांचे अभिनंदन केले. यावेळी नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य डॉ. मनीष पाटील, पंचायत समिती सदस्य निर्मलाताई घरत, नरेश घरत, काँग्रेसचे सरचिटणीस मिलिंद पाडगावकर, संजय ठाकूर, आदित्य घरत आदी मान्यवर उपस्थित होते. त्यांनीही उपसरपंचपदी निवड झाल्यानंतर सुलोचना घरत यांचे अभिनंदन केले.

# सभापतीपदी महेश म्हात्रे,उपसभापती पदी परेश ठाकूर यांची बिनविरोध निवड

दैनिक वादळ वार्ता
**उरण । प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील पंचायत समितीच्या सत्तेवर महाविकास आघाडीने दणदणीत विजय मिळवल्यानंतर आता सभापती व उपसभापती पदांवरही शिवसेना (श्री उद्धव बाळासाहेब ठाकरे गट ),काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (श्री शरदचंद्र पवार गट), शेतकरी कामगार पक्ष,महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांची एकत्रित युती असलेल्या महाविकास आघाडीचाच झेंडा फडकला आहे.

पंचायत समितीच्या सभापती व उपसभापती पदाची निवडणूक बुधवारी (११ मार्च) रोजी संपन्न झाली.पंचायत समितीत शेतकरी कामगार पक्षाकडे चार सदस्य तर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाकडे तीन सदस्य आहेत. त्यामुळे आघाडीच्या ठरलेल्या सूत्रानुसार सभापतीपद शेतकरी कामगार पक्षाकडे तर उपसभापतीपद शिवसेना (उबाठा) गटाकडे गेले आहे.सभापतीपदासाठी शेकापचे ज्येष्ठ सदस्य महेश म्हात्रे तर तर उपसभापती पदासाठी शिवसेना (उबाठा) गटाचे सदस्य परेश ठाकूर यांची निवड झाली आहे.निवडणूक बुधवारी दुपारी २ वाजता पार पडली असून उरणचे तहसीलदार डॉ. उद्धव कदम



यांनी पीठासीन अधिकारी म्हणून काम पाहिले आहे.यावेळी शासनाच्या वतीने विस्तार अधिकारी विनोद मिंडे

गटविकास अधिकारी सर्जेराव पाटील हे सुद्धा उपस्थित होते.निवड होताच शिवसेना रायगड जिल्हा प्रमुख तथा माजी आमदार मनोहरशेठ भोईर, काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या नेत्या तथा नगराध्यक्षा भावनाताई घाणेकर, शेतकरी कामगार पक्षाचे नेते माजी आमदार बाळाराम पाटील, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष संदेश ठाकूर, कामगार नेते तथा शेकाप तालुका चिटणीस रवि घरत तसेच महाविकास आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते, विविध राजकीय पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते यांनी सभापती महेश म्हात्रे व उपसभापती परेश ठाकूर यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. चार वर्षांनंतर झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत उरण तालुक्यात महाविकास आघाडीची लाट कायम असल्याचे पुन्हा स्पष्ट झाले आहे. पंचायत समितीच्या

आठपैकी सात जागांवर विजय मिळवतानाच रायगड जिल्हा परिषदेच्या चारपैकी तीन गटांमध्येही महाविकास आघाडीने आपले वर्चस्व कायम ठेवले आहे.

यापूर्वी उरण नगर परिषदेच्या निवडणुकीतही महाविकास आघाडीने भाजपचा पराभव करून सत्ता काबीज केली होती. त्यामुळे उरण तालुक्यात महाविकास आघाडीची राजकीय पकड अधिक मजबूत झाल्याचे चित्र दिसत आहे.

२०१७ च्या पंचायत समिती निवडणुकीत शेतकरी कामगार पक्ष व काँग्रेस यांची आघाडी होती. त्या वेळी उरण पंचायत समितीत शेकापचे पाच, शिवसेनेचे दोन आणि भाजपचा एक सदस्य असे संख्याबळ होते. मात्र बदललेल्या राजकीय समीकरणांमध्ये महाविकास आघाडीने एकजुटीच्या जोरावर तालुक्यातील राजकारणात पुन्हा आपले वर्चस्व सिद्ध केले आहे.

नुकत्याच संपन्न झालेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत विजयी झालेल्या उमेदवारांचे संख्याबळ:-

जिल्हा परिषदेच्या ४ जागेपैकी ३ जागेवर महाविकास आघाडी तर १ जागेवर भाजप निवडून आले आहे तर पंचायत समितीच्या निवडणुकीत ८ जागा पैकी ७ जागेवर महाविकास आघाडी तर १ जागेवर भाजपचा उमेदवार निवडून आला आहे.

जिल्हा परिषद सदस्य पदाच्या निवडणुकीत नवघर गटातून शिवसेना ठाकरे गटाच्या प्रेरणा पाटील, जासई गटातून काँग्रेस महाविकास आघाडीचे डॉ. मनीष पाटील, चाणजे गटातून भाजपच्या रीना जितेंद्र घरत, तर चिरनेर गटातून काँग्रेसचे ऍड अविनाश ठाकूर हे जिल्हा परिषद सदस्य पदाच्या निवडणुकीत विजयी झाले आहेत.

पंचायत समिती निवडणुकीत नवघर गणातून शिवसेना ठाकरे गटाचे परेश ठाकूर व भेंडखळ गणातून दीपक सुरेश भोईर हे विजयी झाले आहेत. त्याचप्रमाणे जासई गणातून शेतकरी कामगार पक्षाच्या माजी उपसभापती निर्मला नरेश घरत, चिर्ले गणातून प्रियंका दीपक मढवी विजयी झाल्या आहेत.चाणजे गणातून भाजपचे कैलास भोईर तर केगाव गणातून शेतकरी कामगार पक्षाचे माजी पंचायत समिती सदस्य महेश म्हात्रे यांचा विजय झाला आहे. चिरनेर पंचायत गणातून शिवसेना ठाकरे गटाच्या कविता रुपेश पाटील व आवरे गणातून शेकापच्या प्रारंभी गावंड या पंचायत समिती सदस्य पदी विजयी झाल्या आहेत.

# खा.निलेश लंके यांच्या वाढदिवसानिमित्त खरवंडी कासार केंद्रशाळेत शालेय साहित्य व खाऊ वाटप

## अजित पवार यांच्या निधनामुळे वाढदिवस साधेपणाने; सामाजिक कार्यातून विद्यार्थ्यांना मदतीचा हात

दैनिक वादळ वार्ता
**पाथर्डी । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळा खरवंडी कासार येथे अहिल्यानगर जिल्ह्याचे खासदार निलेश लंके यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊ वाटप करण्यात आले. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दुःखद निधनामुळे खासदार लंके यांनी वाढदिवस साजरा न करता वृक्षारोपण करा, सामाजिक कार्य करा हीच मला शुभेच्छा असा संदेश माध्यमांद्वारे दिला होता. त्या अनुषंगाने केंद्रशाळेत विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी साहित्याचे वितरण करण्यात आले.

यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बाबासाहेब केळगंद्रे, सदस्य अशोक केळगंद्रे, माजी शालेय व्यवस्थापन



समिती अध्यक्ष पंढरीनाथ (पप्पू) केकाण, उपाध्यक्ष महादेव जगताप, जय भगवान युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष अनिल जवरे, शालेय समिती सदस्य परवेज पठाण, संदीप केळगंद्रे, पत्रकार विजय शिवगजे, साईनाथ ढोले, संदीप ढगे, महेश म्हस्के आदी उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळेच्या मुख्याध्यापिका लता सुरेश केळगंद्रे यांनी माजी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष पंढरीनाथ (पप्पू) केकाण, समिती अध्यक्ष बाबासाहेब केळगंद्रे, माजी उपाध्यक्ष महादेव जगताप, पत्रकार विजय शिवगजे व सतीश जगताप यांचा सत्कार केला.दरम्यान, शाळेची इमारत काही वर्षांपूर्वी धोकादायक झाल्याने विद्यार्थ्यांचे वर्ग प्रथम ग्रामपंचायत कार्यालयात व नंतर महादेव मंदिरात भरवावे लागले होते. याची तात्काळ दखल घेत जिल्हा परिषद सदस्या प्रभावती प्रतापराव ढाकणे यांनी स्वखर्चातून शाळेच्या प्रांगणात पत्र्याच्या खोल्यांचे शेड उभारून विद्यार्थ्यांसाठी तात्पुरती सुविधा उपलब्ध करून दिली. त्यानंतर त्यांच्या प्रयत्नातून स्लॅबसह संपूर्ण शाळेची नवीन इमारत उभी राहिली. आजही ग्रामस्थ शाळेत गेल्यावर प्रभावती ढाकणे यांचे नाव कृतज्ञतेने घेतात.तसेच माजी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष पंढरीनाथ (पप्पू) केकाण व उपाध्यक्ष महादेव जगताप यांनी स्वखर्चाने शाळेसाठी बोअरवेल, मोटार व साऊंड सिस्टिमची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. खासदार निलेश लंके यांच्या वाढदिवसानिमित्त मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊ वाटप करण्यात आले.सदर कार्यक्रमाचे आयोजन पत्रकार सतीश जगताप यांनी केले होते.

# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे उमा राजन काळे यांचा जागतिक महिला दिनानिमित्त विशेष सन्मान

दैनिक वादळ वार्ता
**सोलापूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ सोलापूर गट - पुणे विभागामार्फत जागतिक महिला दिनानिमित्त, विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला. हा कार्यक्रम ललित कलाभवन, रविवार पेठ सोलापूर येथे पार पडला.

या कार्यक्रमामध्ये महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या मेकॅनिकल विभागामध्ये कार्यरत असणाऱ्या उमा राजन काळे यांना विशेष सन्मानपत्र देऊन गौरवण्यात आले.

उमा काळे यांनी त्यांच्या जीवनामध्ये खूप मोठा संघर्ष केला आहे आणि या संघर्षाचे फलित म्हणून, त्यांचं महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळा मार्फत विशेष असं कौतुक करण्यात आले. कौतुका मुळे महिलांना मोठे कार्य करण्याची प्रेरणा आणि संधी मिळते आणि उल्लेखनीय कार्य करणार्या महिलांच्या पाठीशी समाज उभा राहतो असे प्रतिपादन उमा काळे यांनी केले. महिलांनी एकमेकींना ऊर्जा दिली पाहिजे, गुणांचे कौतुक केले पाहिजे असे सांगून, चांगले काम करणाऱ्या महिलांच्या पाठीशी समाज नेहमी सोबत असतो असं त्या पुढे म्हणाल्या.

यावेळी सत्काराला उत्तर देताना उमा काळे




यांनी स्त्रीचा सन्मान एक दिवस करून जमणार नाही, तिचा दररोज सन्मान झाला पाहिजे. स्त्री शक्तीचा आदर आणि पूजा घरोघरी झाली पाहिजे, असे आवाहन करून कर्तृत्ववान महिलांचा आदर्श इतर महिलांनी सुद्धा घ्यावा असे ही त्यांनी सांगितले. पुढे त्या म्हणाल्या की जिथे स्त्रीचा आदर असतो तिथे देवाचा वास असतो. समाजामध्ये चांगले काम केल्यावर समाज पाठीशी उभा राहतो, असे सांगून समाजाने सुद्धा स्त्रीच्या कर्तृत्वाला वाव देण्याबरोबरच त्यांचा आदर ठेवला पाहिजे असे त्या पुढे म्हणाल्या.

# दिव्यांग लाभार्थ्यांनी २५ मार्चपर्यंत युडीआयडी कार्ड सादर करावे-तहसीलदार संजय वारकड

दैनिक वादळ वार्ता
**नांदेड । प्रतिनिधी**

संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत लाभ घेणाऱ्या नांदेड तालुक्यातील ग्रामीण भागातील दिव्यांग लाभार्थ्यांनी आपले दिव्यांग प्रमाणपत्र (णऊखऊ कार्ड) २५ मार्च २०२६ पर्यंत तहसील कार्यालयात सादर करावे, असे आवाहन तहसीलदार संजय वारकड यांनी केले आहे.

निर्धारित कालावधीत कागदपत्रे सादर न केल्यास अनुदान मिळण्यात अडचणी निर्माण होऊ शकतात, असेही त्यांनी स्पष्ट केले.नांदेड तालुक्यात सध्या या योजनेअंतर्गत एकूण १ हजार २०७ दिव्यांग लाभार्थी लाभ घेत असून त्यांना शासनाकडून दरमहा २ हजार ५०० रुपये अनुदान दिले जाते. मात्र, प्रशासकीय नोंदीनुसार यापैकी ८३३ लाभार्थ्यांनी अद्याप 'युनिक डिसॅबिलिटी आयडेंटिटी कार्ड' (UDID) तहसील कार्यालयात जमा केलेले नाही.लाभार्थ्यांच्या सोयीसाठी कागदपत्रे जमा करण्यासाठी दोन पर्याय उपलब्ध करून देण्यात आले आहेत. लाभार्थ्यांनी आपले णऊखऊ कार्ड व आधार कार्डची झेरॉक्स आपल्या गावातील तलाठी यांच्याकडे जमा करावी किंवा थेट तहसील कार्यालयातील संजय गांधी निराधार योजना विभागात सादर करावी. यासाठी तहसील कार्यालयात स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

शासनाच्या नियमानुसार लाभार्थ्यांची पडताळणी करणे आवश्यक असल्याने दिव्यांग लाभार्थ्यांनी आपले णऊखऊ कार्ड व आवश्यक कागदपत्रे वेळेत सादर करावीत, जेणेकरून अनुदानाचा लाभ विनाव्यत्यय सुरू राहील, असेही तहसीलदार संजय वारकड यांनी सांगितले.



## माहूर नगर पंचायतीचा अजब कारभार

# ऐतिहासिक पुरातण वास्तु भानुतीर्थ सुशोभि करणाच्या नावाखाली निधीचा बट्याबोळ?

दैनिक वादळ वार्ता
**किनवट । प्रतिनिधी**

साडेतीन शक्तिपीठांपैकी मुळपीठ म्हणून प्रसिद्ध असलेल्या माहुर नगरपंचायती तर्फे शहरवासीयांच्या आवश्यक समस्यांचा निपटारा करण्याऐवजी शहरातील ७००वर्षापुर्वीची ऐतिहासिक पुरातण वास्तु भानुतीर्थाच्या सुशोभिकरणाच्या नावाखाली चोहोबाजूंनी अत्यल्प जागेत थातुरमातुर दर्जाहिन कामे करुन निधीचा बट्याबोळ केला जात आहे या प्रकरणी बहुजन नेते तथा सामाजिक कार्यकर्ते केशव गणपतराव भगत यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे कारवाईची मागणी केली आहे.नगर पंचायतीच्या अजब कारभाराबद्दल नागरीकातुन संताप व्यक्त केला जात आहे.

माहूर शहरातून जाणाऱ्या महामार्गासह गल्लीबोळातील खांबावरील पथदिवे बंद




असल्याने सर्वत्र अंधाराचे साम्राज्य पसरले आहे. नळाला आठदिवसाड पाणी पुरवठा,मोकाट जनावरांचा मुक्त संचार, घरकुल लाभार्थ्यांचे अनुदान,व नगर पंचायत हद्दीबाहेर पुरातत्व विभाग, वनविभागाच्या हद्दीत विनापरवानगी दलीत वस्तीच्या विधींसह करोडो रुपयांची दर्जाहीन कामे करुन शासनाच्या निधी गिळंकृत करण्यात आला हे नगरपंचायतीचे मुख्याधिकारी विवेक कांदे यांचेसह वनविभाग, पुरातत्त्व विभाग,समाज कल्याण विभाग यांनी दिलेल्या पत्रानुसार करोडोंचा भ्रष्टाचार उघड झाला आहे. .

या भ्रष्टाचारास जिल्हा धिकाऱ्यांची मुक संमती आहे की काय?असा प्रश्न माहुरवासियांकडु उपस्थित केला जात आहे.या गंभीर प्रकरणी जिल्हा प्रशासन घोटाळेबाजांना पाठीशी का घालतय हे न उलगडणारे कोडेच आहे.

विशेष बाब अशी की शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकाचे सुशोभीकरण करण्याची मागणी नगरसेविका कांबळे यांची मागणी तसेच शहराच्या मुख्य रस्त्यालगत असलेल्या आरक्षित जागेत दिव्यांनी,जेष्ठ , नागरिकांसाठी नमो उद्यान निर्मिती करण्याच्या मागणीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून आओ चोरो बांधो भारा आधा तेरा आधा हमारा या म्हणीप्रमाणे तुम्हारा कैसा भी मेरी झोली भरदो असे भुमिका घेत नागरिकांची मागणी नसतांना नको त्या ठिकाणी दर्जाहिन कामे करुन शासनाचा करोडोंचा नीधी घशात घातला जात असुन या गंभीर बाबीची दखल घेऊन जिल्हाधिकाऱ्यांनी घोटाळेबाजांना कठोर कारवाई करावी अशी रास्त अपेक्षा जनतेतून व्यक्त केली जात आहे.

# शारदा कंट्रक्शनच्या नांदेड शहरातील कामाची उपमुख्यमंत्री तथा नगर विकास मंत्री ना. एकनाथ शिंदे यांच्याकडे चौकशी करण्याची मागणी

## शिवसेनेच्या नगरसेविका सौ.नीलमताई यादव यांची मागणी

दैनिक वादळ वार्ता
**नांदेड । प्रतिनिधी**

नांदेड शहरात असलेल्या गोदावरी नदी काठावर मोठ्या प्रमाणात मे. शारदा कंट्रक्शन च्या वतीने मोठ्या प्रमाणात कोठेवाडी चे कामे चालू आहेत पण गोदावरी नदी पात्रात नांदेड शहरातून गटाराचे वर नालीचे घाण पाणी १७ नाल्याद्वारे गोदावरी नदीमध्ये मिश्रित होत असल्यामुळे त्या गोदावरी नदीचे पावित्र्य अस्तित्वात राहिले नाही त्यामुळे गोदावरी नदी आहे का गटार नदी असे घाणीचे साम्राज्य गोदावरी नदीपात्रात १७ नाल्याचे पाणी जाऊन प्रदुर्शित होत आहे त्यामुळे नांदेड शहरातील गुरुगोविंद सिंगजी यांचे तीर्थस्थान आहे त्यामुळे गोदावरी नदीला अनेक परराज्यातून येणारे भाविक स्नान करत असतात पण अनेक ठिकाणी या नदीच्या पात्रात १७ ठिकाण शहरातील गटार व नालीचे घाण पाणी जात असल्यामुळे सर्वत्र दुर्गंधी पसरली आहे या नाल्याचे काम मे. शारदा कंट्रक्शन कंपनीला दिले असून या कंपनीचे मालक व महापालिकेचे अधिकारी यांना हाताशी धरून नांदेड शहरातील होत असलेल्या कोट्यावधीच कामे हे निकृष्ट दर्जाचे करून ही पोळी भाजून घेत आहेत त्यामुळे मे.शारदा कंट्रक्शनच्या कामाचे सखोल चौकशी करण्यासाठी शिवसेनेच्या नगरसेविका सौ



नीलमताई तुलजेश यादव यांनी थेट महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा नगर विकास मंत्री श्री ना एकनाथ शिंदे साहेब यांची मुंबई येथे भेट घेऊन प्रत्यक्षात त्यांना भेटून निवेदन देण्यात आले व नांदेड शहरातील मे शारदा कंट्रक्शन कंपनीच्या कामाची चौकशी होईपर्यंत त्यांना बिल देण्यात येऊ नये असेही शिवसेनेच्या नगरसेविका सौ नीलमताई तुलजेश यादव यांनी मंत्री महोदय यांना सांगितले यावेळी मंत्री महोदय यांनी निवेदन स्वतः वाचून बघितले आणि तात्काळ चौकशी करण्याच्या सूचना दिले असल्याचे शिवसेना नगरसेविका सौ नीलमताई तुलजेश यादव यांनी सांगितले आहे यावेळी उपस्थित तुलजेश यादव शिवसेना शहर प्रमुख नांदेड दक्षिण उपस्थित होते

# यशवंतराव चव्हाणांचे नेतृत्व, सयाजीराव गायकवाडांचे दातृत्व, संभाजीराजेंचे बलिदान, सावित्रीबाईंचे कर्तृत्वाला इतिहासात तोड नाही-डॉ.वसुदेव गायकवाड

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

स्वानंद सार्वजनिक वाचनालय,आनंदगांव ता.केज जि.बीड येथे दि. १२ मार्च २०२६ रोजी महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी करण्यात आली. अध्यक्षस्थानी ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष,जेष्ठ विचारवंत,जेष्ठ समाज सेवक,महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध वक्ते,परखड व्याख्याते,प्राचार्य,डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड हे होते.प्रमुख व्याख्याते म्हणून दादासाहेब गायकवाड,एस.के.वैरागे यांची व्याख्याने झाली. प्रमुख पाहुणे म्हणून व्यंकटी घोगले,ज्ञानेश्वरी पुंड,कल्याणी भोगजकर यांची उपस्थिती होती. ग्रंथप्रदर्शनाला अनुजा घोगले,वेदिका गायकवाड यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी वाचक यांची उपस्थिती होती.

दि.११ मार्च २०२६ रोजी छत्रपती संभाजीराजे बलिदान दिन,महाराजा सयाजीराव गायकवाड जयंती व्याख्यान व ग्रंथ प्रदर्शनाने साजरी करण्यात आली.अध्यक्ष स्थानी डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड हे होते. यावेळी एम.आय.टी. पुणेचे गोविंद गायकवाड, संजय सोनवणे यांची व्याख्याने झाली. कार्यक्रमाला व ग्रंथ प्रदर्शनाला प्रमुख पाहुणे म्हणून माजी सरपंच रामराजे गायकवाड, नारायणभाऊ गायकवाड,बाबासाहेब वैरागे,मंचक वैरागे,एस. के.वैरागे,बालासाहेब गायकवाड,वेदिका गायकवाड,संजय सोनवणे यांची उपस्थिती होती. दिनांक १० मार्च २०२६ रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती व्याख्यान व ग्रंथप्रदर्शन घेवून साजरी करण्यात आली.यावेळी छोटेखानी वेदिका गायकवाड,नारायणभाऊ गायकवाड,सुभाष गायकवाड यांची थोडक्यात व्याख्याने झाली.व्याख्यान व ग्रंथप्रदर्शन कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून एम. आय.टी.पुणेचे गोविंद गायकवाड,माजी सरपंच रामराजे गायकवाड, बाबासाहेब वैरागे,शौर्य गायकवाड,शिवम गायकवाड,राजविर गायकवाड,वेदिका गायकवाड,आनंद भैय्या गायकवाड,ज्ञानेश्वर गायकवाड,ज्ञानेश्वरी पुंड, श्रुती पुंड,अनुजा घोगले, मधुरा तट,कल्याणी भोगजकर यांची उपस्थिती होती.



अध्यक्षस्थानी डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड हे होते. विविध कार्यक्रमादरम्यान अध्यक्षीय समारोप करताना यशवंतराव चव्हाणांच्या नेतृत्वाला, महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या दातृत्वाला,छत्रपती संभाजीराजे यांच्या बलिदानाला,सावित्रीबाई फुले यांच्या कर्तृत्वाला इतिहासात तोड नाही असे प्रतिपादन अध्यक्षीय समारोप प्रसंगी डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले.वेगवेगळया दिवशी आयोजित सर्व कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन ग्रंथालयाचे आनंद भैय्या गायकवाड यांनी केले.

# राष्ट्रीय विश्वगामी पत्रकार संघाच्या नंदुरबार जिल्हाध्यक्ष पदी योगेश्वर बुवा तर सचिवपदी रविंद्र वळवी यांची नियुक्ती

दैनिक वादळ वार्ता
**रविंद्र वळवी । मोलगी**

राष्ट्रीय विश्वगामी पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष संतोष निकम यांच्या आदेशान्वये नंदुरबार जिल्ह्याची नूतन कार्यकारणी जाहीर करण्यात आली . नंदुरबार जिल्हाध्यक्षपदी योगेश्वर बुवा यांची फेरनिवड करण्यात आली तर सचिव पदी रवींद्र वळवी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

राष्ट्रीय विश्वगामी पत्रकार संघाचे नुकतेच शिर्डी येथे राज्यस्तरीय अधिवेशन पार पडले. या अधिवेशनात राष्ट्रीय अध्यक्ष संतोष निकम, राष्ट्रीय सचिव रमेश देसाई, प्रदेशाध्यक्ष वैभव पाटील, महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष सुलभा पवार यांच्या संमतीने नंदुरबार जिल्ह्याची जम्बो कार्यकारणी गठीत करण्यात आली.





यावेळी राज्यभरातील विविध जिल्ह्यातील जिल्हाध्यक्ष व पत्रकार संघाचे पदाधिकारी उपस्थित होते. नंदुरबार जिल्ह्याची कार्यकारिणी पुढीलप्रमाणे जाहीर करण्यात आली. यात जिल्हाध्यक्ष योगेश्वर बुवा, सचिव रवींद्र वळवी, कार्याध्यक्ष प्रभू तडवी, जिल्हा संपर्कप्रमुख गंगाराम वसावे, उत्तर महाराष्ट्र संघटक प्रमुख डॉ. जसपाल वळवी, उत्तर महाराष्ट्र संपर्कप्रमुख अनिल जावरे, जिल्हा उपाध्यक्ष नितीन चौधरी, रमेश पाटील, प्रशांत राजपूत, जिल्हा सहसंपर्कप्रमुख तुषार नाईक, रमेश आर. पाटील, जिल्हा सहसचिव हेमंत परदेशी, दीपक गोसावी, जिल्हा सल्लागार ड. अमरसिंग वसावे, ड. रूपसिंग वसावे, तर जिल्हा सदस्य म्हणून आनंदराव पवार, वेस्ता पाडवी, विजय वळवी, जितेंद्र हिरे, विजय दगडू पवार, धडगाव तालुकाध्यक्ष मंगेश वळवी, शहादा तालुकाध्यक्ष पुलायन जाधव, शहादा तालुका उपाध्यक्ष दीपक गोसावी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नवनियुक्त सर्व पदाधिकाऱ्यांचे राष्ट्रीय अध्यक्ष संतोष निकम यांनी अभिनंदन केले.

> **राष्ट्रीय विश्वकमी पत्रकार संघ हा महाराष्ट्रातील पत्रकारांच्या विविध समस्या, पत्रकारांवर होणारे हल्ले रोखण्यासाठी कायदेशीर लढाई तसेच पत्रकारांच्या समस्या सोडविण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील राहत असून पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी लढा उभारण्याचे काम करत असतो.तरी या राष्ट्रीय विश्वगामी पत्रकार संघाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील पत्रकारांच्या अनेक अडी अडचणी सोडविण्याचे काम केले जाणार आहे.**
>
> **योगेश्वर बुवा**
> **जिल्हाध्यक्ष नंदुरबार**
> **राष्ट्रीय विश्वगामी पत्रकार संघ**

# भोपळा तांडा ते माहूर पोहरादेवी पदयात्रेचे शेळगाव छत्री येथे आगमन

दैनिक वादळ वार्ता
**नायगाव । प्रतिनिधी**

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी देखील दिनांक १० मार्च २०२६ पासून मौजे भोपाळा तांडा येथून माहूर ते पोहरादेवी पदयात्रा ही निघाली असून यातील दिंडी चालक पुजारी श्री रामराव शंकर जाधव व सौ महालनबाई रामराव जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली निघालेली पदयात्रा मौजे शेळगाव छत्री येथे दाखल झाली या निमित्ताने प्रसादाचा व भजनाचा आस्वाद गावकऱ्यांनी घेतला आहे. संत सेवालाल महाराज या थोर संताचे विचार पुढे घेऊन जात त्यांचा महिमा सर्वत्र रुजविण्यासाठी नायगाव तालुक्यातील मौजे भोपाळ तांडा ते माहूर पोहरादेवी या देवस्थानापर्यंत भक्ती भावाने दिंडीचे चालक पुजारी श्री रामराव शंकर जाधव सौ महालनबाई रामराव जाधव श्री गोरख महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली निघालेली पदयात्रा ही शेळगाव छत्री येथे दाखल झाली असून या पदयात्रेचे स्वागत गावचे गंगाधरराव माली पाटील यांनी केले आहे मुक्कामी असलेल्या पदयात्रेतील भजनी मंडळींनी प्रसाद व भजनाचा कार्यक्रमाचे आयोजन केले यामध्ये अनेकांनी आस्वाद घेतला आहे संत सेवालाल महाराजांनी मानवांना मानवतेची शिकवण दिली लोकांच्या कल्याणासाठी आयुष्यभर चंदनापरी झिजले त्यांचे विचार आचार सर्वत्र रुजविण्यासाठी या पदयात्रेचे दरवर्षीच नियोजन केले जाते असे पुजारी श्री रामराव जाधव यांनी सांगितले शेळगाव छत्री येथे एक दिवशीय मुक्कामी असलेल्या पद यात्रेतील सरपंच प्रतिनिधी देविदास राठोड रमेश धारु चव्हाण बळीराम पवार सिताराम राठोड विठ्ठल महाराज काशीराम राठोड अरुण राठोड घमसूबाई चव्हाण सागर राठोड रतनबाई चव्हाण सज्जाबाई पवार निलुबाई राठोड सुरेखाबाई राठोड मीराबाई राठोड अनिता बाई जाधव यासह अनेकांनी भजनात व पद यात्रेत सहभाग नोंदविला आहे. संत सेवालाल महाराज यांच्या पद यात्रेतील भजनी मंडळींसाठी राजेश गंगाधरराव माली पाटील माजी सरपंच जळबा वाघमारे गजानन सोनटक्के देशमुख रावसाहेब वाघमारे हरिदास डोंगरे संभाजी पाटील पेदे यांनी परिश्रम घेऊन सहकार्य केले आहे.

# रमजान हा त्याग,संयम आणि बंधुभाव शिकवणारा महिना-जयसिंग सोळंके

## पात्रुड येथे सरपंच लतीफ मोमीन यांच्या इफ्तार पार्टीस मान्यवरांची उपस्थिती

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

रमजान हा मुस्लीम धर्मीयांचा अत्यंत पवित्र महिना असून, तो केवळ उपवासाचा (रोजा) नसून, संयम, त्याग, बंधुभाव, शांती आणि मानवता शिकवणारा महिना मानला जातो. असे विचार माजी जिल्हा परिषद बांधकाम सभापती जयसिंग सोळंके यांनी व्यक्त केले.

पात्रुड येथे सरपंच लतीफ मोमीन यांच्या वतीने मंगळवार दि.१० रोजी त्यांच्या निवासस्थानी आयोजित इफ्तार पार्टी निमित्त त्यांनी आपली मत व्यक्त केले.



यावेळी बोलताना जयसिंग सोळंके म्हणाले की, रमजान हा केवळ उपवासाचा महिना नसून त्याग, संयम, शांती आणि बंधुभाव शिकवणारा पवित्र महिना आहे. या महिन्यात गरजूंना मदत करून समाजात प्रेम आणि ऐक्य वाढवण्याचा प्रयत्न केला जातो. दरम्यान इफ्तार कार्यक्रमाच्या माध्यमातून सर्व धर्मीय बांधव एकत्र येऊन समाजात सौहार्दाचे वातावरण निर्माण करण्याचे काम होत असल्याचेही यावेळी उपस्थित मान्यवरांनी सांगितले. याप्रसंगी पात्रुडचे सरपंच लतीफ मोमीन, एकनाथ मस्के, संपादक सुभाष नागलगावकर, डॉ. वसीम मनसबदार, घनश्याम भुतडा, भीमराव टाकणखार, किशोर जावळे, राहुल लंगडे, अर्जुन नाईकनवरे, शंतनू सोळंके, दिलीप झगडे, यासह राजकीय, सामाजिक क्षेत्रातील पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमानंतर सर्वांनी एकत्रित इफ्तार घेत रमजानच्या पवित्र महिन्याच्या शुभेच्छा दिल्या.

# स्वयंम शिक्षण प्रयोग संस्थांतर्गत कौशल्य व व्यवसाईक महिलांना प्रमाणपत्र वितरण

दैनिक वादळ वार्ता
**लातूर । प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनानिमित्त निलंगा येथे स्वयंम शिक्षण प्रयोग संस्थेच्या वतीने ज्या महिलांनी शिवन काम, आरी वर्क ,ब्युटी पार्लर जुठ बॅगचे प्रशिक्षण घेतले आहे त्यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. स्वयंम शिक्षण प्रयोग संस्था महिला सक्षमीकरणासाठी सातत्याने विविध उपक्रम राबवत असते. संस्थेच्या स्वावलंबन प्रकल्पा अंतर्गत निलंगा तालुक्यातील शंभर गावांमध्ये विविध उपक्रम राबवले जात आहेत .या प्रकल्पाच्या माध्यमातून गाव पातळीवर महिलांना सेंद्रिय शेती, शेतीपूरक व्यवसाय उद्योजकता व्यावसायिकता पाणी संवर्धन व तसेच कौशल्य विकास यासंदर्भात मोफत प्रशिक्षण देण्यात येते महिलांना आर्थिक दृष्ट्या सक्षम व्हावे व स्वाभिमानाणे स्वतःच्या पायावर उभे राहावे. या उद्देशाने संस्थेमार्फत उपक्रम राबवले जात आहेत.




या कार्यक्रमाला कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून आयसी आय बँकेचे मॅनेजर अनिल माने सर व लोंढे सर उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रस्ताविक व संस्थेची माहिती प्रकल्प समन्वयक दिपक लांडगे सर यांनी यांनी दिली. त्यानंतर अनिल माने सर व लोंढे सर यांनी बँकेतर्फे असणाऱ्या विविध स्कीम विषयी महिलांना मार्गदर्शन केले व त्याचा लाभ घेण्यासाठी सर्वांना सांगितले. त्यासाठी लागणारे सर्व कागदपत्रे याची सविस्तर माहिती देण्यात आली. त्यानंतर सर्वांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाद्वारे महिलांनी स्वतःचा व्यवसाय करून आपले उत्पन्न वाढवावे व स्वावलंबी बनवण्याचा संस्थे मार्फत प्रयत्न केला जात आहे.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तालुका समन्वयक सुनील काळुंके परिसर समन्वयक पवन कदम ,संध्या गायकवाड व ज्योती जगताप उपस्तीत होते.

# केज नगरपंचायतीत घरकुल अनुदानाचा ४ कोटींचा डल्ला अतिरिक्त पदभाराच्या नावाखाली प्रशासक राजवटीत लूट!

## १५५ धनादेशांद्वारे ४ कोटी २४ लाखांचे नियमबाह्य वाटप । एसआयटी (SIT) चौकशीचे आदेश । मोठे मासे गळाला लागण्याची शक्यता

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज नगरपंचायतीमध्ये पंतप्रधान आवास योजनेच्या(घरकुल)निधीत तब्बल ४ कोटी ३६ लाख रुपयांचा महाघोटाळा समोर आला आहे. गोरगरिबांच्या हक्काचे घरकुल अनुदान लाभार्थी ऐवजी कंत्राटदार आणि तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या खिशात घातल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून, विशेष म्हणजे हा संपूर्ण काळाबाजार प्रशासक राजवट असताना आणि अतिरिक्त पदभार असलेल्या अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने झाला आहे.

**नेमका घोटाळा काय?**

म्हाडाकडून केज नगर पंचायतीला ३७४ लाभार्थ्यांच्या घरांसाठी कोट्यवधींचा निधी प्राप्त झाला होता.नियमानुसार हा निधी थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जाणे अपेक्षित होते.मात्र, चौकशीत असे समोर आले की,केवळ ११६ लाभार्थ्यांना १ कोटी ६७ लाख रुपयांचे वाटप झाले.उर्वरित ४ कोटी २४ लाख रुपये तब्बल १५५ धनादेशांद्वारे इतरत्र नियमबाह्य पद्धतीने वळवण्यात आले.यामध्ये तांत्रिक कर्मचाऱ्यांचे वेतनही नियमबाह्यरीत्या याच निधीतून काढण्यात आले.

**स्वाक्षऱ्यांचा खेळ आणि अधिकारांचा गैरवापर**

या घोटाळ्यातील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे ज्या अधिकाऱ्यांकडे त्या काळात पदभार नव्हता, त्यांनीही धनादेशांवर स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

१.मिलिंद सावंत (तत्कालीन जिल्हा प्रशासन अधिकारी) : यांच्या कार्यकाळात ८८ धनादेशांद्वारे २ कोटी ६५ लाख ७० हजार ९४९ रुपये वितरित झाले. विशेष म्हणजे,सचिन देशपांडे यांच्याकडे पदभार असतानाही सावंतांच्या स्वाक्षरीचे ७८ धनादेश वटले.

२.नीता अंधारे (तत्कालीन जिल्हा प्रशासन अधिकारी) : यांच्या स्वाक्षरीने ६७ धनादेशांद्वारे १ कोटी ५९ लाख २ हजार २७४ रुपयांचे वितरण झाले. अशोक साबळे मुख्याधिकारी असताना अंधारेंनी ३६ धनादेशांवर स्वाक्षऱ्या केल्या.




**विधानसभेत पडसाद ; एसआयटी चौकशीची घोषणा**

केजच्या आमदार नमिता मुंदडा यांनी हिवाळी अधिवेशनात याघोटाळ्या बाबत लक्षवेधी सूचना मांडली होती.त्यावर उत्तर देताना राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी हा घोटाळा मान्य करत, याची चौकशी SIT (विशेष तपास पथक) मार्फत आणि आर्थिक गुन्हे शाखेमार्फत (एजथ) करण्याचे आदेश दिले आहेत. जिल्हाधिकाऱ्यांना एका आठवड्यात अहवाल सादर करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

**'अर्धे तुझे,अर्धे माझे' : भ्रष्टाचाराचे परफेक्ट प्लॅनिंग**

प्राथमिक चौकशीनुसार, अधिकारी,कर्मचारी, कंत्राटदार आणि काही स्थानिक पुढाऱ्यांनी मिळून 'अर्धे तुझे आणि अर्धे माझे' या सूत्राने हा निधी लाटला आहे. गोरगरिबांच्या घरांचे स्वप्न धुळीस मिळवून स्वतःचे खिसे भरणाऱ्या या टोळी तील अनेक 'मोठे मासे' आता एसआयटीच्या गळाला लागण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

**चौकशी समितीचा फास आवळला**

उपविभागीय अधिकारी दीपक वजाळे,जयंत तळीखेडे,प्रकाश कुंभार, रविकांत करडे आणि अंकुश देशमुख यांची समिती सध्या या प्रकरणाची सखोल चौकशी करत असून, लवकरच मोठा फौजदारी गुन्हा दाखल होण्याची चिन्हे आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077